# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::

Date 02/07/2025


: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


## पोलीस स्टेशन बल्लारपूर हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाई मधील दारु ही बनावट असल्याचे निष्पन्न

### राज्य उत्पादन शुल्क विभागाचा रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त

स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर चे पथक पोलीस स्टेशन बल्लारपूर हद्दीत अवैध धंदे विरुध्द कारवाईची पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन कळमना गावाजवळ नाकाबंदी करुन एक महिन्द्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. **MH34-CJ-6576** ला थांबवून पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यात अवैध रित्या देशी विदेशी दारु साठा मिळुन आला. तसेच सदर गुन्हयात पायलटींग करीता वापरलेला वाहन टाटा अल्ट्रोझ क्र. **MH34-CJ-7337** चा चालक सदर वाहन सोडुन पळुन गेला. यावरुन सदर प्रकरणी पो.स्टे.बल्लारपूर येथे अपराध क्रमांक ४६२/२०२५ कलम ६५ (अ), ८५ महाराष्ट्र दारुबंदी कायदान्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सदर गुन्हयात आरोपी नामे नितीन राजन कुंडे वय ३५ वर्ष रा.राजेंद्रप्रसाद वार्ड बल्लारपूर यास अटक करुन त्याचे ताब्यातील वाहनामधील अवैध दारु साठा (१) देशी दारु रॉकेट संत्रा **90 ml** च्या ३८०० नग निपा किं.१,३३,०००/- रु. (२) बिअर **haywards 5000 500 ml** च्या ७२ टिन किं.९३६०/- रु. (३) विदेशी दारु **Imperial Blue 180ml** च्या ४८ नग निपा किं. ८१६०/- रु. (४) महिन्द्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. **MH34-CJ-6576** किं.१५,००,०००/- रु. (५) टाटा अल्ट्रोझ क्र. **MH34-CJ-7337** किं.७,००,०००/- रु. असा एकुण २३,५०,५२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

**सदर गुन्हयातील जप्त दारु साठा मधील नमुन्याची पडताळणी करणे बाबत राज्य गुन्हे उत्पादन शुल्क विभागास पत्र दिल्याने त्यांनी सदर जप्त दारु साठी मधील नमुन्याची रासायनिक विश्लेषण करुन सदरची दारु ही बनावट असल्याबाबत अहवाल दिलेला आहे.**

**यावरुन सदर गुन्हयात बनावट दारु संबंधाने कलम १२३, ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ४९ भारतीय न्याय संहिता-२०२३ चे वाढ करण्यात आले असुन पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत.**

## मुल बस स्थानक परिसरात हरवलेली बॅगचा शोध घेवुन महिलेस अर्ध्या तासाचे आत परत केल्याने तिने मानले पोलीसांचे आभार

## पोलीस स्टेशन मुल ची कामगिरी

दिनांक ३० जुन, २०२५ रोजी पोलीस स्टेशन मुल येथे तक्रारदार महिला नामे सौ. मंजुषा मनोज नैताम वय ३५ वर्ष रा. पडोली हया तिचे नातेवाईकांसह गडचिरोली येथुन चंद्रपूर ला जात असतांना मुल बस स्थानक परिसरात तिची कथ्या रंगाची लेटर बॅग ज्या मध्ये एक विवो कंपनीचा मोबाईल किं.३०,०००/- , नगदी २५००/- रु., एक एटीएम कार्ड आणि महत्वाचे दस्तऐवज असलेली हरविल्याने तिने व तिचे नातेवाईकांनी सदर हरविलेल्या बॅग चा मुल आणि बस स्थानक परिसरात शोध धेतला परंतु बॅग मिळुन न आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन मुल येथे येवुन तक्रार नोंदविली.

मुल पोलीसांनी सदर तक्रारीची तत्काळ दखल घेवुन सायबर पोलीस स्टेशन च्या मदतीने तांत्रिक पध्दतीने हरविलेल्या बॅग चा शोध घेवुन अर्ध्या तासाचे आंत सदर बॅग व त्यामधील वरील नमुद सर्व साहित्ये तक्रारकर्त्या महिलेस परत केले. यावरुन सदर महिलेने चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक आणि मुल पोलीसांचे आभार मानले.

सदरची कामगिरी मुल पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री सुबोध वंजारी यांचे नेतृत्वात पोउपनि वर्षा नैताम, नापोअं चिमाजी देवकते, पोअं. शंकर बोरसरे, नरेश कोडापे यांनी केली आहे.

# अवैध देशी-विदेशी दारु वाहतुक करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई

# स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर ची कामगिरी

दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर चे पथक पोलीस स्टेशन बल्लारपूर हद्दीत अवैध धंदे विरुध्द कारवाईची पेट्रोलींग करीत असतांना मुखबिर कडुन मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन कळमना गावाजवळ नाकाबंदी करुन एक महिन्द्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. **MH34-CJ-6576** ला थांबवून पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यात अवैध रित्या देशी विदेशी दारु साठा मिळुन आला. तसेच सदर गुन्हयात पायलटींग करीता वापरलेला वाहन टाटा अल्ट्रोझ क्र. **MH34-CJ-7337** चा चालक सदर वाहन सोडुन पळुन गेला. यावरुन सदर प्रकरणी पो.स्टे.बल्लारपूर येथे अपराध क्रमांक ४६२/२०२५ कलम ६५ (अ), ८५ महाराष्ट्र दारुबंदी कायदान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर गुन्हयात आरोपी नामे नितीन राजन कुंडे वय ३५ वर्ष रा.राजेंद्रप्रसाद वार्ड बल्लारपूर यास अटक करुन त्याचे ताब्यातील वाहनामधील अवैध दारु साठा (१) देशी दारु रॉकेट संत्रा **90 ml** च्या ३८०० नग निपा किं.१,३३,०००/- रु. (२) बिअर **haywards 5000 500 ml** च्या ७२ टिन किं.९३६०/- रु. (३) विदेशी दारु **Imperial Blue 180ml** च्या ४८ नग निपा किं.८१६०/- रु. (४) महिन्द्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. **MH34-CJ-6576** किं. १५,००,०००/- रु. (५) टाटा अल्ट्रोझ क्र. **MH34-CJ-7337** किं.७,००,०००/- रु. असा एकुण २३,५०,५२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पाहीजे असलेला आरोपी नामे सिध्दार्थ उर्फ बापु भास्कर रंगारी रा.कारवा रोड, रविंद्रनगर वार्ड बल्लारपूर याचा शोध धेणे सुरु आहे. गुन्हयाचा पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहे

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक श्री ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सपोनि श्री दिपक कॉक्रेडवार, सफौ स्वामीदास चालेकर, पोहवा किशोर वैरागडे, अजय बागेसर, प्रमोद कोटनाके, पोअं शेखर माथनकर, गोपीनाथ नरोटे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी केली आहे.